# प्रेसनोट

नाशिक,
दि. १३/०२/२०२४

आलोसे क्र.१ भिमराव उर्फ भुषण यशवंत जाधव, सहकार अधिकारी (व्दितीय श्रेणी) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक २) अनिल नथ्थुजी घरडे, सहायक सहकार अधिकारी (वरीष्ठ लिपीक) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक यांनी ५,००,०००/-रूपये लाचेची मागणी केल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | मुंबईनाका पोलीस स्टेशन, नाशिक शहर. गुरनं. ३३/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) भिमराव उर्फ भुषण यशवंत जाधव, वय ४५ वर्षे, सहकार अधिकारी (व्दितीय श्रेणी) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक<br>२) अनिल नथ्थुजी घरडे, वय ५२ वर्षे, सहायक सहकार अधिकारी (वरीष्ठ लिपीक) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/-रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | -- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे कामास असलेल्या गोदामृत अर्बन को- ऑप सोसायटीत महेश जाधव यांनी सन २०१८ साली घेतलेले कर्ज भरणा केले नाही म्हणुन तक्रारदार यांनी उपनिबंधक कार्यालय येथुन महेश जाधव यांचे घर लिलावाबाबत मिळविलेल्या आदेशाविरूद्ध महेश जाधव यांनी रिव्हीजन दाखल केली होती सदर रिव्हीजन चे विभागीस सहनिबंधक कार्यालय नाशिक येथे सुरू असलेल्या चौकशीत तक्रारदार यांचे सोसायटीचे बाजुने निकाल लावण्यासाठी आलोसे १) भिमराव उर्फ भुषण यशवंत जाधव, सहकार अधिकारी (व्दितीय श्रेणी) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग यांनी ५,००,०००/-रूपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी केली असता पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे १) भिमराव उर्फ भुषण यशवंत जाधव, सहकार अधिकारी (व्दितीय श्रेणी) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग यांनी तक्रारदार यांचे कडे ५,००,०००/-रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले व आलोसे २) अनिल नथ्थुजी घरडे, सहायक सहकार अधिकारी (वरीष्ठ लिपीक) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक यांनी प्रोत्साहन दिल्याचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द मुंबईनाका पोलीस स्टेशन, नाशिक शहर. गुरनं. ३३/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे दि. ३१/०१/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्‌दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००

( नरेंद्र भा.पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक